RNI No. MAHBIL/2009/31743

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक-अ—मध्य उप-विभाग

वर्ष २, अंक ४४] बुधवार, नोव्हेंबर १०, २०१०/कार्तिक १९, शके १९३२ [पृष्ठे ६, किंमत : रुपये २०.००

असाधारण क्रमांक ११६

प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.**

नगरविकास विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ६ नोव्हेंबर २०१०

अधिसूचना

**मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९.**

क्रमांक एमएमसी. २००८/४८१/प्र.क्र. १९/नवि-३२ (१).—मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई एकोणसाठ) च्या कलम ४५६अ चे पोट-कलम (१) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा व त्याबाबतीत त्यास समर्थ करणा-या इतर अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई एकोणसाठ) अंतर्गत अनुसूची 'घ' मधील नियम जे उक्त अधिनियमाच्या कलम ४५६अ च्या पोट-कलम (२) मधील आवश्यकतेनुसार पुर्वी प्रसिद्ध करण्यात आले होते त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे, ते असे :–

(१) या नियमांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका (महानगरपालिकेची निवडणूक घेणे) (अनुसूची 'घ' ची सुधारणा) नियम, २०१० असे म्हणावे.

(२) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या अनुसुची 'घ' मधील नियमांच्या नियम १० च्या पोट-कलम (१) च्या ऐवजी खालील पोट-नियम दाखल करण्यात येईल :–

"(१) एखाद्या प्रभाग निवडणुकीसाठी उमेदवाराच्या नामनिर्देशनासाठी नियत केलेल्या दिनांकाला किंवा त्यापूर्वी प्रत्येक उमेदवाराने रुपये पाच हजार एवढी रोख रक्कम निवडणूक अधिका-याकडे ठेव म्हणून जमा केली पाहिजे किंवा करण्याची व्यवस्था केली पाहिजे, उमेदवाराने अशी ठेव न भरल्यास तो योग्य रितीने नामनिर्देशित झाला असल्याचे मानण्यात येणार नाही :

परंतु, जेव्हा उमेदवार, अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती किंवा नागरिकांचा मागासवर्ग किंवा महिला यामधील असेल आणि अशा उमेदवाराने त्याचे महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० च्या तरतुदींना अनुसरून, सक्षम प्राधिका-याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर केलेले असेल तर अशा बाबतीत, उमेदवाराने अशाप्रकारे ठेवावयाची अनामत रक्कम दोन हजार पाचशे इतकी असेल;

परंतु, आणखी असे की, जेव्हा उमेदवाराने एकाच जागेसाठी एकापेक्षा अधिक नामनिर्देशनपत्रे दाखल केली असल्यास, प्रत्येक नामनिर्देशनपत्राकरिता एकापेक्षा अधिक वेळा अनामत रक्कम जमा करण्याची आवश्यकता नाही."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

आ. श्रा. जिवने,

शासनाचे उप सचिव.

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 6th November 2010

*NOTIFICATION*

BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACT, 1949.

No. MMC. 2008/481/CR-19/UD-32 (1).—In exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 456A of the Bombay Provinicial Municipal Corporations Act, 1949 (Bom. LIX of 1949) and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the rules in Schedule 'D' to the Bombay Provinicial Municipal Corporations Act, 1949, the same having been previously published, as required by sub-section (2) of section 456A of the said Act, namely :—

1. These rules may be called the Bombay Provinicial Municipal Corporations (Conduct of Elections to the Corporation) (Amendment of Schedule D) Rules, 2010.

2. In the rules in Schedule D to the Bombay Provinicial Municipal Corporations Act, 1949, in rule 10, for sub-rule (1), the following sub-rule shall be substituted, namely :—

"(1) On or before the date appointed for the nomination of candidates for a ward election, each candidate shall deposit or cause to be deposited with the Returning Officer, in cash, a sum of five thousand rupees; and no candidate shall be deemed to be duly nominated unless such deposit has been made :

Provided that, where the candidate belongs to the Scheduled Castes or Scheduled Tribes or Backward Class of Citizens, or is a Woman, the amount of deposit shall be two thousand and five hundred rupees, if such candidate produces his Caste Certificate issued by the Competent Authority and the Validity Certificate issued by the Scrutiny Committee in accordance with the provisions of the Maharashtra Scheduled Castes, Scheduled Tribes, Denotified Tribes (*Vimukta Jatis*), Nomadic Tribes, Other Backward Classes and Special Backward Category (Regulation of Issuance and Verification of) Caste Certificate Act, 2000 :

Provided further that, where the candidate has filed more than one nomination paper for the same seat, it shall not be necessary to deposit a separate amount in respect of each nomination paper. ".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A. S. JIWANE,
Deputy Secretary to Government.

नगरविकास विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ६ नोव्हेंबर २०१०

अधिसूचना

**महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५.**

क्रमांक एमएमसी. २००८/४८१/प्र.क्र. १९/नवि-३२ (३).—महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. अधि. ४०) याचे कलम १७ च्या पोट-कलम (२) च्या खंड (घ) आणि (ड) व कलम ३२१ च्या पोट-कलम (१) आणि (२) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा व त्याबाबतीत त्यास समर्थ करणा-या इतर अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र नगरपरिषदा. नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. अधि. ४०) अंतर्गत महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती निवडणूक नियम, १९६६ चे उक्त अधिनियमाच्या कलम ३२१ च्या पोट-कलम (३) मधील आवश्यकतेनुसार पूर्वी प्रसिद्ध करण्यात आले होते त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे, ते असे :—

१. या नियमांना महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती निवडणूक (सुधारणा) नियम, २०१० असे म्हणावे.

२. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती निवडणूक नियम, १९६६ मधील नियम १४ मध्ये,—

(अ) पोट-नियम (१) च्या ऐवजी पुढील पोट-नियम दाखल करण्यात यावा :—

"(१) एखाद्या नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी उमेदवाराच्या नामनिर्देशनासाठी नियत केलेल्या दिनांकाला किंवा त्यापूर्वी उमेदवाराने रोख रक्कम निवडणूक अधिका-याकडे ठेव म्हणून जमा केली पाहिजे किंवा करण्याची व्यवस्था केली पाहिजे, उमेदवाराने अशी ठेव न भरल्यास तो योग्य रितीने नामनिर्देशित झाला असल्याचे मानण्यात येणार नाही. ती रक्कम म्हणजे,—

(१) "अ" वर्ग नगरपरिषदांच्या बाबतीत रुपये तीन हजार ;

(२) "ब" वर्ग नगरपरिषदांच्या बाबतीत रुपये दोन हजार ;

(३) "क" वर्ग नगरपरिषदांच्या बाबतीत रुपये एक हजार ;

उमेदवाराने अशी ठेव न भरल्यास तो योग्यरितीने नामनिर्देशित झाला असल्याचे मानण्यात येणार नाही.

परंतु, जेव्हा उमेदवार, अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती किंवा नागरिकांचा मागासवर्ग किंवा महिला यामधील असेल आणि अशा उमेदवाराने जमा करावयाची अनामत रक्कम,—

(१) "अ" वर्ग नगरपरिषदांच्या बाबतीत रुपये एक हजार पाचशे ;

(२) "ब" वर्ग नगरपरिषदांच्या बाबतीत रुपये एक हजार ;

(३) "क" वर्ग नगरपरिषदांच्या बाबतीत रुपये पाचशे ;

जर अशा उमेदवाराने त्याचे महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० च्या तरतुदींना अनुसरुन, सक्षम प्राधिका-याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर केले असेल :

परंतु, आणखी असे की, जेव्हा उमेदवाराने एकाच जागेसाठी एकापेक्षा अधिक नामनिर्देशनपत्रे दाखल केली असल्यास, एकापेक्षा अधिक वेळा अनामत रक्कम जमा करण्याची आवश्यकता नाही.

(ब) पोट-नियम (३) च्या ऐवजी पुढील पोट-नियम दाखल करण्यात येईल :—

"(३) अनामत रक्कम समपहत झाली नाही तर ती निवडणुकीचा निकाल घोषित करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर परत करण्यात येईल.

परंतु जर एखादा उमेदवार सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी एकापेक्षा अधिक प्रभागांसाठी रीतसर नामनिर्देशित झाला असेल तर, त्याने किंवा त्याच्या वतीने दिलेल्या अनामत रकमांपैकी एकाहून अधिक अनामत रकमा परत करण्यात येणार नाहीत व उर्वरित रकमा नगरपालिकेकडे समपहत होतील."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**आ. श्रा. जिवने,**

शासनाचे उप सचिव.

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 6th November 2010

### *NOTIFICATION*

MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.

No. MMC. 2008/481/CR-19/UD-32 (3).—In exercise of the powers conferred by clause (d) and (e) of sub-section (*2*) of section 17 read with sub-section (*1*) and (*2*) of section 321 of the Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act, 1965 (Mah. XL of 1965); and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats Election Rules, 1966; the same having been previously published, as required by sub-section (*3*) of section 321 of the said Act, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats Election (Amendment) Rules, 2010.

2. In rule 14 of the Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats Election Rules, 1966,—

(*a*) for sub-rule (1), the following sub-rule shall be substituted, namely :—

"(1) On or before the date appointed for the nomination of candidates for a ward election, each candidate shall deposit or cause to be deposited with the Returning Officer in cash a sum of rupees,—

(*i*) three thousand in case of "A" Class Municipal Council ;

(*ii*) two thousand in case of "B" Class Municipal Council ;

(*iii*) one thousand in case of "C" Class Municipal Council ;

and no candidate shall be deemed to be duly nominated unless such deposit has been made :

Provided that, where the candidate belongs to the Scheduled Castes or Scheduled Tribes of Backward Class of Citizens, or is a woman, the amount of deposit shall be rupees,—

(*i*) one thousand and five hundred in case of "A" Class Municipal Council ;

(*ii*) one thousand in case of "B" Class Municipal Council ;

(*iii*) five hundred in case of "C" Class Municipal Council ;

if such candidate produces his Caste Certificate issued by the Competent Authority and the Validity Certificate issued by the Scrutiny Committee in accordance with the provisions of the Maharashtra Scheduled Castes, Scheduled Tribes, De-notified Tribes (*Vimukta Jatis*), Nomadic Tribes, Other Backward Classes and Special Backward Category (Regulation of Issuance and Verification of) Cast Certificate Act, 2000 :

Provided further that, where the candidate has filed more than one nomination paper for the same seat, it shall not be necessary to deposit a separate amount in respect of each nomination paper";

(*b*) for sub-rule (3), the following rule shall be substituted, namely :—

"(3) The deposit shall, if it is not forfeited, be returned, as soon as may be, after the declaration of the result of the election :

Provided that, if a candidate is duly nominated at a general election in more than one ward, not more than one of the deposits made by him or on his behalf shall be returned and the reminder shall be forfeited to the Council".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A. S. JIWANE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A,NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.